# पिंपरी चिंचवड महानगरपालिका
## मा.क्रिडा समिती
## कार्यपत्रिका क्रमांक- १४
## सभावृत्तांत

दिनांक- २१/०४/२०१० वेळ :- दुपारी ४.०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.क्रीडा समितीची पाक्षिक सभा बुधवार दिनांक २१/०४/२०१० रोजी दुपारी ४.०० वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारती मधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा. सदस्य उपस्थित होते.

१) मा.खेडकर घनशाम रामचंद्र - सभापती
२) मा.गणेश तुकाराम भोंडवे
३) मा.आसवानी डब्बु
४) मा.काटे राजेंद्र भिकनशेठ

याशिवाय मा.भंडारे-प्र.उपनगरसचिव हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

-------------------------

<u>उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीप्रमाणे खालील ऐनवेळचे विषय सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आले :-</u>

विषय क्रमांक-३) नि.नो.क्र.२/२००७-०८ चे मंजूर दरांनुसार मनपा व्यायामशाळा साहित्याची दुरुस्ती करणे) बाबत- मा.गणेश भोंडवे, मा.विजया जाधव यांचा प्रस्ताव...

विषय क्रमांक-४) क्रिकेट व कराटे स्पर्धा आयोजित करणेबाबत-मा.गणेश भोंडवे, मा.विजया जाधव यांचा प्रस्ताव...

विषय क्रमांक-५) महापौर चषक राज्यस्तरीय फुटबॉल स्पर्धा आयोजित करणेबाबत- मा.गणेश भोंडवे, मा.विजया जाधव यांचा प्रस्ताव...

विषय क्रमांक-६) पिंपरी-चिंचवड शहर विविध क्रिडा संघटना जिल्हा दर्जा मिळवून देणेबाबत-मा.गणेश भोंडवे, मा.विजया जाधव यांचा प्रस्ताव...

-------------------------

खालीलप्रमाणे सूचना मांडणेत आली.

सुचक- मा.गणेश भोंडवे　　　　　　　　अनुमोदक- मा.डब्बू आसवानी

सोमवार दिनांक २६/४/२०१० रोजी दुपारी ४.०० पर्यंत सभा तहकुब करणेत यावी.

सदर सूचना सर्वानुमते मान्य झाली.

-----------

मा.सभापती- सोमवार दिनांक २६/४/२०१० रोजी दुपारी ४.०० पर्यंत सभा तहकूब करणेत येत आहे

----------

[खेडकर घनशाम रामचंद्र]
सभापती
क्रिडा समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी- ४११ ०१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
मा.क्रिडा समिती
कार्यपत्रिका क्रमांक- १४
सभावृत्तांत
(दिनांक २१/४/२०१० ची तहकुब सभा)

दिनांक- २६/४/२०१० वेळ- दुपारी ४.०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.क्रीडा समितीची दिनांक २१/४/२०१० ची तहकुब सभा सोमवार दिनांक २६/४/२०१० रोजी दुपारी ४.०० वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारती मधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा. सदस्य उपस्थित होते.

१) मा.खेडकर घनशाम रामचंद्र - सभापती
२) मा.गणेश तुकाराम भोंडवे
३) मा.जाधव विजया अशोक (मामी)

याशिवाय मा.चाकणकर-उपनगरसचिव, मा.पानसरे-क्रिडा अधिकारी हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

मा.सभापती : सभा कामकाज उरकणेसाठी आवश्यक गणसंख्या सभागृहात नसल्याने बुधवार दिनांक ५/५/२०१० रोजी दुपारी ३.४५ पर्यंत सभा तहकूब करणेत येत आहे

----------

[खेडकर घनशाम रामचंद्र]
सभापती
क्रिडा समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी- ४११ ०१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
मा.क्रिडा समिती
कार्यपत्रिका क्रमांक- १४
सभावृत्तांत
(दिनांक २१/४/२०१० व २६/४/२०१० ची तहकुब सभा)

दिनांक- ५/५/२०१० वेळ- दुपारी ३.४५ वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.क्रीडा समितीची दिनांक २६/४/२०१० ची तहकुब सभा बुधवार दिनांक ५/५/२०१० रोजी दुपारी ३.४५ वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारती मधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा. सदस्य उपस्थित होते.

१) मा.खेडकर घनशाम रामचंद्र - सभापती
२) मा.गणेश तुकाराम भोंडवे
३) मा.सुमनताई मधुकर पवळे
४) मा.आसवानी डब्बु
५) मा.काटे राजेंद्र भिकनशेठ
६) मा.जाधव विजया अशोक (मामी)

याशिवाय मा.कारचे-सहाय्यक आयुक्त, मा.चाकणकर-उपनगरसचिव, मा.पानसरे-क्रिडा अधिकारी हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

दि.७/४/२०१० रोजी झालेल्या सभेचा (कार्यपत्रिका क्रमांक १३) सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

---

ठराव क्रमांक- ४० विषय क्रमांक- १
दिनांक- ५/०५/२०१० विभाग- क्रीडा
सुचक :- मा.सुमनताई पवळे अनुमोदक :-मा.विजया जाधव
संदर्भ :-मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.क्रीडा/ग्रं/कावि/६४०/२००९ दि.१८/११/२००९

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे-

प्रस्तावात नमुद केल्याप्रमाणे मे.सुमित स्पोर्टस ॲण्ड फिटनेस, इक्विपमेंट्स, चिंचवड, पुणे- १९ व मे.वरदायिनि एन्टरप्रायझेस,चिंचवड,पुणे १९ यांचे नावापुढे नमुद केलेल्या तलावांची पाणीशुध्दीकरण, परिसर स्वच्छता व यांत्रिक देखभाल दुरुस्ती कामाचे प्रस्तावात नमुद केलेले दरांस (मासिक दर अ.क्र.१ ते ८ तलाव एकुण र.रु.६,४४,०००/-) व पिंपळे गुरव जलतरण तलाव नवीन असल्याने, या तलावाच्या कामाचे दर मंजुर नसल्याने, या तलावाची पाणी साठविण्याची क्षमता मोहननगर,चिंचवड जलतरण तलावा इतकीच (१० लाख लिटर्स) असल्याने, त्या तलावांच्या दराने

र.रु.८५,०००/- मासिक दरांप्रमाणे पिंपळे गुरव जलतरण तलाव पाणी शुध्दीकरण, परिसर स्वच्छता व यांत्रिक देखभाल दुरुस्ती कामकाज करुन घेण्यास व याकामाचे संबंधित ठेकेदारांकडुन एक वर्षाचा करारनामा करुन घेण्यास मान्यता देणेकामी मा.स्थायी समितीकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.स्थायी समितीकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------------------

ठराव क्रमांक- ४१ विषय क्रमांक- २
दिनांक- ५/०५/२०१० विभाग- क्रीडा
सुचक- मा.विजया जाधव अनुमोदक-मा.गणेश भोंडवे
संदर्भ :-मा.अतिरिक्त आयुक्त यांचे जा.क्र.क्रीडा/४/कावि/२७१/२०१० दि.७/४/२०१०

मा.अतिरिक्त आयुक्त यांची शिफारस विचारात घेवुन..

म.न.पा.ची स्वा.सावरकर व्यायामशाळा निगडी (प्राधिकरण) सेवाशुल्क तत्वावर वनिता मंडळ, निगडी (प्राधिकरण) या संस्थेस चालविण्यास द्यावयाची की शरयूनगर प्रतिष्ठान प्राधिकरण या संस्थेस चालविण्यास द्यावयाची याबाबत फेरविचार करून शरयूनगर प्रतिष्ठान प्राधिकरण या संस्थेस चालविण्यास देण्यास मान्यता देणेत यावी अशी मा. स्थायी समिती कडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.स्थायी समितीकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------------------

<u>सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आलेले विषय घेणेत आले -</u>

ठराव क्रमांक- ४२ विषय क्रमांक :- ३
दिनांक- ०५/०५/२०१०
सुचक- मा.गणेश भोंडवे अनुमोदक- मा.विजया जाधव
संदर्भ- मा.गणेश भोंडवे, मा.विजया जाधव यांचा प्रस्ताव..

मनपा व्यायामशाळेतील व्यायाम साहित्याची दुरुस्ती करून घेणेकामी क्रिडा विभागा कडून कोटेशन नोटीस प्रसिध्द करूनही यास प्रतिसाद मिळालेला नाही. मनपा व्यायामशाळेतील व्यायाम साहित्याची दुरुस्ती करून मिळणेबाबत नागरीक व मा.नगरसदस्य सतत मागणी करीत असतात. तरी नि.नो.क्र.२/२००७-०८ चे मंजूर दरांनुसार मे.गिनिज स्पोर्टस, पुणे-२६ यांचेकडून विहीत नमुन्यात २ वर्षाचा करारनामा करून आवश्यक अनामत रकमेचा एफ.डी.आर. घेऊन मनपा व्यायामशाळा साहित्याची दुरुस्ती करणेस व त्याकामी येणाऱ्या अंदाजे र.रू.१०,००,०००/- चे खर्चास मान्यता देणेत यावी अशी मा.स्थायी समितीकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.स्थायी समितीकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक- ४३ विषय क्रमांक :- ४
दिनांक- ०५/०५/२०१०
सुचक- मा.गणेश भोंडवे अनुमोदक- मा.विजया जाधव
संदर्भ- मा.गणेश भोंडवे, मा.विजया जाधव यांचा प्रस्ताव..

पिंपरी चिंचवड मनपाच्या वतीने मनपा परिसरात महापौर चषक जिल्हास्तरीय क्रिकेट व कराटे स्पर्धा आयोजित करणेस व त्याकामी येणाऱ्या खर्चास मान्यता देणेत यावी अशी मा.स्थायी समितीकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.स्थायी समितीकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक- ४४ विषय क्रमांक :- ५
दिनांक- ०५/०५/२०१०
सुचक- मा.गणेश भोंडवे अनुमोदक- मा.विजया जाधव
संदर्भ- मा.गणेश भोंडवे, मा.विजया जाधव यांचा प्रस्ताव..

पिंपरी चिंचवड मनपाच्या वतीने स्व.राजेश बहल स्पोर्ट्स ॲन्ड सोशल फाऊंडेशन, संत तुकाराम नगर, पिंपरी-१८. यांच्या सहकार्याने व पुणे जिल्हा फुटबॉल असोशिएशन यांच्या मान्यतेने दि.२८ मे २०१० ते ६ जुन २०१० या काळात डॉ.बाबासाहेब आंबेडकर क्रिडा संकुल, संत तुकारामनगर, पिंपरी-१८ येथे महापौर चषक राज्यस्तरीय फुटबॉल स्पर्धा आयोजित करणेस व त्याकामी येणाऱ्या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेत यावी अशी मा.स्थायी समितीकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.स्थायी समितीकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक- ४५ विषय क्रमांक :- ६
दिनांक- ०५/०५/२०१०
सुचक- मा.गणेश भोंडवे अनुमोदक- मा.विजया जाधव
संदर्भ- मा.गणेश भोंडवे, मा.विजया जाधव यांचा प्रस्ताव..

पिंपरी चिंचवड मनपाच्या वतीने मनपा परिसरात विविध प्रकारच्या खेळ सुविधा उपलब्ध करून दिलेल्या आहेत. या खेळांचा विकास होण्याच्या दृष्टीने मनपा परिसरात खेळ प्रकारानुसार पिंपरी चिंचवड शहर विविध क्रीडा संघटना स्थापन झालेल्या आहेत. परंतू या संघटनाना जिल्हा दर्जा महाराष्ट्र ऑलिंपिक असो. यांचेकडून मिळालेला नाही तरी पिंपरी चिंचवड शहर क्रीडा संघटनाना जिल्हा दर्जा मिळण्याच्या दृष्टीने मा.आयुक्त, मा.महापौर यांचे मार्फत पाठपुरावा करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहीर केले.

[खेडकर घनशाम रामचंद्र]
सभापती
क्रिडा समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी- ४११ ०१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी- ४११ ०१८, नगरसचिव कार्यालय
क्रमांक- नस/९/कावि/५९७/२०१०
दिनांक- ०६/०५/२०१०

सही/-
उपनगरसचिव
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी-४११ ०१८

प्रत :- सर्व संबंधीत शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.